स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 12–04–2016** रोजी **सायंकाळी 04–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| 5. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| 8. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| 9. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| 10. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| 11. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| 12. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 13. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 14. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 15. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 16. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 57ः– नागपूर शहरातील हुडकेश्वर–नरसाळा येथे पायाभूत सोयी सुविधा निर्मिती अंतर्गत पाणी पुरवठा योजने करीता राज्यशासनाने महानगरपालिकेस दिलेल्या अर्थसहाय्य प्रकल्पांतर्गत Package-1- "Providing, Lowering, Laying & Jointing D.I.K-9 Trunk Main of Diameter 600 to 500 mm to Connect Proposed ESR in Hudkeshwar & Narsala" च्या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदांमध्ये निम्नतम निविदाकार M/s SMC Infrastructure Pvt. Ltd., Thane यांची प्राकलनीय राशीवर 11% कमीच्या दराने म्हणजेच रु. 10,17,27,000.00 च्या निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 58</u>:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) शारदा नगर, निलकंठ नगर, ताजेश्वर नगर, धांडे ले आऊट चंद्रभागानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) शारदा नगर, निलकंठ नगर, ताजेश्वर नगर, धांडे लेआऊट चंद्रभागानगर रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – बी स्वस्तिक हॉडवेअर ते प्राईड बिअर बार च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण१३ निविदाकारांपैकी मे. अमृता कंन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,४०,१५,६०८/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 59</u>:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) गणेशधाम येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) गणेशधाम रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – एल) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १० निविदाकारांपैकी मे. आर एम दयारमानी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ५२,२१,३९९/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 60</u>:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) साईनगर – १,२, गिरीबालाजी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) साईनगर – १,२, गिरीबालाजी नगर येथील रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – जे, सांकेत कॉनव्हेट ते हुडकेश्वर नाला च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १४ निविदाकारांपैकी मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,५६,९६,२७७/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 61</u>:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) दुबे नगर, ए.बी सी.येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) जयप्रकाश नगर, विद्यानगर नगर, गुलमोहर कॉलोनी, पिपळा फाटा, हुडकेश्वर बुद्रुक मारोती नगर येथील रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – एच, ई हुडकेश्वर नाला ते पिपळा फाटा च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १४ निविदाकारांपैकी मे. प्रोनिक्स इजि. यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. २,०३,३१,४५८/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 62</u>:– नेहरू नगर झोन क्र. 05 प्रभाग क्र. 63 अ अंतर्गत संजयगांधी नगर, श्रीराम नगर, गुरूदेव नगर, सुदर्शन कॉलनी, रूख्मीणी नगर, न्यू सुभेदार रोड, अयोध्या नगर, आदिवासी नगर, आशिर्वाद नगर बिडीपेठ येथे 6 मी. खांबावर व 70/150 वॉट सो. व्हे. फिटिंग व विविध ठिकाणी 12.5 मी. ऊंच हॉयमस्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई–निविदा बोलविल्या असता, प्राप्त तिन (3) निविदांपैकी मे. अर्जुन इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची रू. 27,85,950/– ची प्राकलनीय दारापेक्षा 18.5 टक्के ने कमी असलेली निम्नतम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 63</u>:–** मौजा – हुडकेश्वर या भागातील १) स्वभाग्य नगर, पवार नगर, स्वरोस्वती नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) स्वभाग्य नगर, पवार नगर, स्वरोस्वती नगर येथील रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – डी, सेलिब्रेशन लॉन ते स्मॉल वंडर स्कुल च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १२ निविदाकारांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,३९,६५,८५१/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 64</u>:–** नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी स्थीत ॲनिमल शेल्टर चालविण्याकरीता मागविण्यात आलेल्या EOI (जा. क्र. १२६/पीआर दि. २४/०७/२०१५ नुसार) मध्ये सहा सेवाभावी संस्था सहभागी झाल्या असून दिनांक २४/०९/२०१५ ला संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसमक्ष प्रस्ताव उघडण्यात आले. सहभागी सर्व संस्थांपैकी मे. द पिपल्स फॉर ॲनिमल वेलफेअर ऑर्गनायझेशन, नागपूर व मे. इंडीयन सोसायटी फॉर ॲनिमल हयुमन वेलफेअर, नागपूर या दोन संस्थेचे प्रस्ताव परीपुर्ण आढळून आले. मा. अपर आयुक्त यांचे कक्षामध्ये दि. ०८/१२/२०१६ ला दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना प्राप्त प्रस्तावावर चर्चेकरीता बोलविण्यात आले असता दोन्ही संस्थांनी एकत्रिक काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार दोन्ही संस्थांनी आपसात MoU करुन सादर करण्याची सुचना देण्यात आली. दोन्ही संस्थांनी आपसात MoU करुन दिनांक १२/०२/२०१६ ला सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावानुसार महानगरपालिकेव्दारे या कामाकरीता दोन्ही संस्थांना कुठल्याही प्रकारचे मानधन किंवा निधी देण्यात येणार नसून भांडेवाडी ॲनिमल शेल्टर आहे त्या स्थीतीत चालविण्याकरीता देणे आहे. तसेच महानगरपालिकेव्दारे पशुरुग्ण वाहीका (सर्व साहीत्य व मणुष्यबळासह) उपलब्ध करुन देणे, अनिमल शेल्टर येथे स्वच्छतेकरीता सफाई कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येईल. संस्थाव्दारे पशुरुग्णवाहीकेवर तक्रारींचे निराकरणाकरीता एक कर्मचारी नियुक्त करणे, ॲनिमल शेल्टर मधील जख्मी/आजारी जनावरांकरीता औषधोपचार करणे, पशुवैद्यक नेमणे, जख्मी/आजारी जनावरांची देखभाल व पालणपोषन करणे, देखरेखीकरीता कर्मचारी नेमणे, तसेच केलेल्या कामाचा मासीक अहवाल महानगरपालिकेला सादर करणे ई. कामे संस्थेस करणे आहे.

करीता द पिपल्स फॉर ॲनिमल वेलफेअर ऑर्गनायझेशन, नागपूर व मे. इंडीयन सोसायटी फॉर ॲनिमल हयुमन वेलफेअर, नागपूर या दोन्ही संस्थांना भांडेवाडी स्थीत ॲनिमल शेल्टर एकत्रित रित्या चालविण्याकरीता प्रस्ताव विचारात घेऊन त्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 65</u>:–** नागपूर शहरातील हुडकेश्वर–नरसाळा येथे पायाभूत सोयी सुविधा निर्मिती अंतर्गत पाणी पुरवठा योजने करीता राज्यशासनाने महानगरपालिकेस दिलेल्या अर्थसहाय्य प्रकल्पांतर्गत Package-4- “Providing, Lowering, Laying & Jointing HDPE & D.I K-7 Distribution Network of Various Diameter (110 to 200 Mm O.D HDPE Pipe and Above D.I K-7 Pipe).” च्या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदांमध्ये निम्नतम निविदाकार M/s Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd. यांची प्राकलनीय राशीवर 2.35% कमीच्या दराने म्हणजेच रु. 18,70,97,400.00 च्या निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 66ः–</u> नागपूर शहरातील हुडकेश्वर–नरसाळा येथे पायाभूत सोयी सुविधा निर्मिती अंतर्गत पाणी पुरवठा योजने करीता राज्यशासनाने महानगरपालिकेस दिलेल्या अर्थसहाय्य प्रकल्पांतर्गत Package-3- "Providing, Lowering, Laying & Jointing HDPE & D.I.K-7 Distribution Network of Various Diameter (110 To 200 Mm O.D. HDPE Pipe And Above D.I. K-7 Pipe)." च्या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदांमध्ये निम्नतम निविदाकार M/s. SMC Infrastructure Pvt. Ltd., Thane यांची प्राकलनीय राशीवर 3.6% कमीच्या दराने म्हणजेच रु. 18,47,02,400.00 च्या निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 67ः–</u> प्रभाग क्र. ४१ अ चांदणीपुरा शिंगाडा मार्केट येथे सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ८ निविदांपैकी मे. रफीक अहमद रियाझ अहमद यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.५० टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४९,२४,८४६/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 68ः–</u> हनुमान नगर झोन क्र. ०३, प्रभाग क्र. ६२ ब अंतर्गत विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई-निविदा बोलविल्या असता, प्राप्त तीन (३) निविदांपैकी में. अर्जुन इलेक्ट्रीकल्स, नागपूर, यांची रु. २०,७१,४१९/- ची प्राकलनिय दरापेक्षा १९.१% ने कमी असलेली निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 69ः–</u> महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम. आय. डि. सी. हिगंणा करिता डाबंर एच.पि.सि.एल./बि.पि.सि.एल/आय.ओ. सि.एल रिफायनरीज मूबंई कडून डाबंर वाहतुक करण्याच्या कामाकरीता निम्नतम निविदाकार मे. एन. जि. अग्रवाल यांची प्राकलनिय दरापेक्षा 30.17% कमी दराची रु. 55,32,788.00 राशीची निविदा स्वीकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 70ः–</u> नागपूर शहराकरिता मंजूर विकास योजनेतील मौजा–पारडी खसरा क्र. 83/1, 84, 87/1–3 मधील श्रीमती सरस्वतीबाई पांडुरंगजी तलमले तर्फे प्रायमार्क इंजिनियर्स, यांच्या मालकीच्या जागेपैकी दफनभुमी/स्मशानभुमी (आरक्षण क्र. E-6) करीता आरक्षित 25010.00 चौ.मी. (6.18 एकर) जागा, 30.00 मी. रुंद रस्त्याचे आरक्षणा खालील 6880.00 चौ.मी. (1.70 एकर) जागा व 18.00 मी. रुंद रस्त्याचे आरक्षणा खालील 4490.00 चौ.मी. (1.11 एकर) जागा अशा एकूण 36380.00 चौ.मी. (8.99 एकर) जागेचे भु–संपादन करण्यास्तव स्थायी समिती ठराव क्र. 83 दि. 08.07. 2013 अन्वये रु. 12,28,00,000/– चे तरतुद उपलब्ध करुन देण्याचा प्रस्तावास मंजुरी प्रदान केलेली होती. त्या अनुषंगाने भु–संपदानाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास दि. 16.07.2013 रोजी सादर करण्यात आला असता जिल्हाधिकारी कार्यालया तर्फे कार्यालयीन पत्र क्र. 468/2015 दि. 19.06.2015 नुसार थेट वाटाघाटी पद्धतीने रु. 61,11,84,000/– किंवा नियमित भु–संपादनाद्वारे रु. 58,05,38,116/– राशी आकारण्यात आली होती. यासाठी आवश्यक तरतुद उपलब्ध करण्यास्तव मा. स्थायी समिती समोर सादर केले असता ठराव क्र. 412 दि. 08.01.2016 नुसार ''यापूर्वी ठराव क्र. 83 दि. 08.07.2013 अन्वये रु. 12.28 कोटी चे प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात आली होती. तथापी मंजूर राशीवर विभागाने सादर केलेल्या

प्रस्तावित भुसंपदान राशीत फार मोठा फरक असल्याने विभागाचा प्रस्ताव नामंजुर करुन परत पाठविण्यात आला.''

त्यानंतर उपजिल्हाधिकारी भुसंपादन (सामान्य) या कार्यालयाने पत्र क्र. 339/दि. 22.02.2016 नुसार सुधारीत राशी रु. 34,00,32,000/– (थेट वाटाघाटीप्रमाणे) किंवा रु. 32,30,08,792/– (नियमित भुसंपादनाद्वारे) व वृत्तपत्रीय सूचना प्रकाशन रोख रक्कम रु. 21,000/– चा अपेक्षित खर्च कळविला असल्याने त्यानुसार वरीलप्रमाणे सुधारित तरतुद उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. ४१२ दिनांक ०८.०१.२०१६ प्रमाणे कार्यालयाने कोणतेही कार्यवाही केलेली प्रथम दर्शनी दिसून येते व तसा अहवाल व कार्यवाही अद्याप प्रस्तावित केली नाही. राज्य शासनाच्या नविन टि.डी.आर. देण्यासंबंधीच्या धोरणाप्रमाणे अर्जदार टि.डी.आर. देण्यास इच्छुक आहे का हे तपासावे व तसा पत्र व्यवहार प्रशासनाने अर्जदारा बरोबर करावा. तसेच प्रस्तावित करण्यात आलेली राशी देण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्प २०१६–१७ मध्ये प्रावधान आहे का व असल्यास प्रमुख लेखा वित्त अधिकारी यांचा अभिप्राय घेऊन मगच हे प्रकरण स्थायी समिती समोर सादर करावे. या सुचनेसह व ठराव क्र. ४१२ ची पुर्तता न केल्यामुळे विषय कार्यालयास परत करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 71</u>:– विद्यापीठ वाचनालय ते अमरावती रोड पर्यंतच्या महाराजबाग रस्त्यावर (EP ६९) २४ मिटर रूंदीच्या पूलाचे निर्मीतीकरीता रू. ४८५.३० लक्षाचे व प्रकल्प व्यवस्थापक म्हणून मे. एस. पी. डी. इन्फ्रास्ट्रक्चर, पी.पी.देशपांडे यांची नेमणुकसह रू. १०.६७ लक्षाचे खर्चासह एकुण ४९५.९७ लक्षाचे ढोबळ प्राकलनास मंजुरी करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 72</u>:– प्रभाग क्र. ४० अ आणि ब गंजीपेठ येथील टाटा पारसी शाळेपासून ते गांधीपुतळा पर्यंत आणि भालदरपुरा येथील श्री बन्सोड यांचे घरापासून ते अलहास चौकापर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ८ निविदांपैकी मे. महेन्द्र पी सोनटक्के यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.०१ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४९,४८,४८१/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 73</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर